# मिरा भाईंदर महानगरपालिका
# महिला व बालकल्याण विभाग
## // प्रेसनोट//

**"जागतिक महिला दिनानिमित्त, महिला व बालकल्याण विभागामार्फत भाररत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे मेमोग्राफी तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते तसेच महिलांच्या आरोग्य विषयक होणाऱ्या समस्या/उपाययोजना व महिलांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगिण विकासावर मार्गदर्शनपर व्याख्यान/कार्यशाळा**

मिरा भाईंदर महानगरपालिका, महिला व बालकल्याण विभागा मार्फत "जागतिक महिला दिनानिमित्त" आस्थापनेवरील महिलांकरिता मेमोग्राफी(स्तन कॅन्सर) तपासणी शिबिर भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, दुसरा मजला, मिरारोड येथे दि.11/03/2024 पासून सुरु करण्यात आले असुन सदर शिबिरात महानगरपालिकेच्या विविध विभागातील 40 वर्षावरील एकुण 25 महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे. सदर मेमोग्राफी तपासणी दि.11/03/2024 पासून सुरु राहणार असून महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सर्व विभागातील 40 वर्षावरील महिला या योजनेचा लाभ घेणार आहेत

महिला व बालकल्याण विभागामार्फत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांच्या आरोग्य विषयक होणाऱ्या समस्या/उपाययोजना व महिलांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगिण विकासावर मार्गदर्शनपर व्याख्यान/कार्यशाळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, मांडली तलाव, तिसरा मजला, भाईंदर(प.) येथे दु.3.00 ते संध्या 5.00 वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमांत शहरातील गरीब व गरजू महिलांना देण्यात येणाऱ्या विविध योजनेच्या आर्थिक सहाय्याचे धनादेश मा.अति.आयुक्त, श्री.अनिकेत मनोरकर, मा.उपायुक्त, श्रीम.कल्पिता पिंपळे, सहा.आयुक्त श्रीम.कांचन गायकवाड, यांच्या हस्ते एकुण 8 लाभार्थ्यांना धनादेश वाटप करण्यात आले

तसेच महिलांच्या आरोग्य विषयक होणाऱ्या समस्या/उपाययोजना याबाबत मार्गदर्शनाकरिता महानगरपालिकेचे डॉ. मिनल पिंपळे, स्त्रीरोग तज्ञ व असोसिएट प्रोग्राम डायरेक्टर(Associate Program Director) स्नेहा NGO मध्ये कार्यरत असलेल्या श्रीम.शिल्पा अडळकर यांचेमार्फत महिलांच्या व्यक्तिमत्वांच्या सर्वांगिण विकासावर मार्गदर्शनपर व्याख्यान देण्यात आले.

तसेच विविध् सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करुन महिलांना अल्पोपहार देण्यात आले. सदर कार्यक्रमात आस्थापनेवरील महिला कर्मचारी वर्ग, बालवाडी शिक्षिका, आशा वर्कस, संगणक चालक इत्यादी मोठया संख्येने उपस्थित राहिल्या होत्या.

महिला व बालकल्याण अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner